संपादकीय....

## हुक्क्यामध्ये फक्त निकोटिन!

### 'फॉरेन्सिक'चा अहवाल; गांजा आढळल्यास एक लाख रूपये दंड व दहा वर्षे शिक्षेची तरतूद

शहरातील हॉटेलमध्ये सुरू असलेल्या हुक्का पार्लरमध्ये दिल्या जाणाऱ्या हुक्क्यामध्ये गांजा असल्याचे सर्वश्रृत आहे. मात्र, हुक्क्यामध्ये फक्त निकोटिनसह विविध फ्लेवर असल्याचे न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा (फॉरेन्सिक) विभागाने अहवाल देते. हुक्क्यामध्ये अमली पदार्थ विशेषत: गांजा आढळल्यास संबंधित हॉटेल चालकाला एक लाख रूपये दंड आणि दहा वर्षे शिक्षेची तरतूद आहे. मात्र, गेली कित्येक वर्षांत हुक्क्यामध्ये अशा प्रकारचे अमली पदार्थ आढळलेच नसल्याचा निर्वाळा 'फॉरेन्सिक' विभागाने दिला आहे.

शहरात कोणकोणत्या हॉटेल्समध्ये हुक्का सुरु आहे, याची गुन्हे शाखेकडे असते. यासह स्थानिक सर्वच पोलिस ठाण्यांना असते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक त्यांच्या हद्दीत सुरू असलेल्या हॉटेल्सना तोंडी व लेखी तंबी वेळोवेळी देतात. विमानगर, येरवडा व कोरेगाव पार्क, चंदननगर यासह चतु:श्रृंगी पोलीस ठाण्याने काहींनी हॉटेल्समधील व हर्बलच्या नावाखाली सुरू असलेल्या हुक्का पार्लरमधील नुमने पडताळण्यासाठी गृह विभागाच्या 'फॉरेन्सिक' मध्ये पाठविले होते. या संदर्भात तेथे चौकशी केल्यानंतर हुक्क्यामध्ये निकोटिनसह विविध फ्लेवर असल्याची माहिती समोर आली. दरम्यान, अंमली पदार्थ विरोधी पथकाने शहरातील विविध ठिकाणी छापे मारून सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने (जाहिरात प्रतिबंध आणि व्यापार, वाणिज्य उत्पादन पुरवठा व वितरण यांचे विनीमय) अधिनियमा अंतर्गत व अन्न सुरक्षा मानके अधिनियम कलमाअंतर्गत नियमांचे उल्लंघन केलेल्यांवर कारवाई करून तंबाखुजन्य उत्पादने व सिगारेट, फ्लेवर तंबाखुजन्य उत्पादने जप्त केली आहेत. मात्र, ही तात्पुरती कारवाई आहे. गांजाची रोपे लावणे, ती जवळ बाळगणे गुन्हा आहे. या गुन्ह्यात एक लाख रूपये दंड व दहा वर्षांच्या शिक्षेची तरतूद आहे. त्यामुळे व्यसनाधिन युवकांना शहरातील हॉटेल्समध्ये मिळणाऱ्या हुक्क्यामधून गांजाची तलफ भागविता येते. व्यसनमुक्ती केंद्रातील डॉक्टर, समुपदेशक व व्यसनमुक्त होऊन पूर्ववत आयुष्य जगणारे छातीठोकपणे हुक्क्यामध्ये गांजा असल्याचे सांगतात. मात्र, पोलिस हुक्का पार्लरवर कारवाई करून येथील नुमने फॉरेन्सिक विभागात पाठवितात. तेथे नुमन्यांचे रासायनिक विश्लेषण होते. त्याचा अहवाल पोलिसांना पाठविला जातो. दरम्यानच्या प्रवासात हुक्क्यात (गांजा हवेत उडून जाऊन) फक्त निकोटिनचा अंश शिल्लक राहतो. याचा फायदा हुक्का चालकांना मिळतो. गेली कित्येक वर्षांत कोणत्याच हॉटेल चालकांच्या हुक्क्यात गांजा आढळलेले दिसून येत नाही. त्यामुळे त्यांना शिक्षा झाल्याची माहिती समोर येत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. दर महिन्याला शहरातील पाच ते सहा हॉटेल्सच्या हुक्का पार्लरमधील नुमने संबंधित पोलिस ठाण्यातुन प्राप्त होतात. हुक्क्यामधील द्रावणाचे रासायनिक विश्लेषण केल्यानंतर त्यामध्ये निकोटिन व काही फ्लेवर आढळतात. त्याचा अहवाल पोलिस ठाण्यांना पाठवत असल्याची माहिती न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडून देण्यात येते.

**हुक्क्यामध्ये अमलीपदार्थ गांजा, ब्राऊनशुगरसह सुंगधी द्रव्य**

पुणे शहरात सुरू असलेल्या हॉटेलमधील हुक्का पार्लरमध्ये ग्राहकांना गांजा, ब्राऊनशुगरची तलफ हुक्क्याच्या माध्यमातून भागविली जाते. त्यामुळे हुक्का ओढल्यानंतर अधिकच झिंग येते. त्यामुळे हुक्का ओढणारी व्यक्ती व्यसनाच्या आहारी जात असल्याचे व्यसनमुक्ती केंद्रात उपचार घेणाऱ्या युवकाने सांगितले. याला व्यसनमुक्ती केंद्रातील समुपदेशकांनी दुजोरा दिला आहे.

पुणे शहर पोलिस आयुक्तालयातील अमलीपदार्थ विरोधी पथकाला गुंगारा देऊन शहरातील हॉटेल्सवाले राजरोसपणे हुक्का पार्लरमध्ये गांजा, ब्राऊनशुगर आदी वापरत असल्याचे आढळून आले आहे. हुक्का पार्लर चालकांना कोणा, कोणाची मर्जी सांभाळावी लागते याची यादीत त्यांच्याकडे असते. या यादीत अग्रक्रमावर अमलीपदार्थ विरोधी पथकाचे नाव असते. त्यानंतर गुन्हेशाखा, स्थानिक पोलिस ठाण्यातील अधिकारीच नव्हे तर गस्तीवर असणाऱ्या बीट मार्शलची सुध्दा त्यांना मर्जी सांभाळावी लागते. त्यामुळे हुक्क्यामध्ये 'हर्बल' पदार्थ वापरले जातात हा युक्तीवाद फोल ठरतो. तर हुक्क्यामध्ये अमलीपदार्थ घातले जात असल्याचे पुरावे प्रत्यक्षदर्शी नव्हे तर व्यसनाधिन झालेले व आता उपचार घेत असलेल्या रुग्णांनी सांगितले.यासह अशा रुग्णांवर उपचार करणारे डॉक्टर व समुपदेशकांनी सुध्दा याला दुजोरा दिला आहे.

हुक्क्यामध्ये गांजा, ब्राऊनशुगर टाकत असण्याची दाट शक्यता आहे. व्यसनमुक्ती केंद्रात उपचारासाठी आलेल्या रुग्णांच्या आरोग्य तपासणी अहवालात आढळून येत असल्याचे मत शहरातील व्यसनमुक्ती केंद्रातील समुपदेशकांचे आहेत. तर सुरवातीला गंमत म्हणून मित्रांसोबत हुक्का पॉर्लरमध्ये जात होता. तेथे हुक्का ओढणाऱ्या मुलींचे आकर्षण वाटत होते. हुक्क्यामध्ये गांजा, ब्राऊनशुगर टाकले जात होते. व्यसनाधिन झाल्यानंतर 'विड्रॉल'अवस्था झाली होती. काय करतो, काय बोलतो याचे भान राहत नव्हते. पालकांनी मला व्यसनमुक्ती केंद्रात टाकल्यामुळे आता थोडे बरे वाटत असल्याची प्रतिक्रिया काही युवकांनी दिल्या आहेत.

या घटना सांस्कृतिक व शैक्षणिक केंद्र असलेल्य पुणे शहरात दररोज घडत आहेत. यांच्यावर जरब कोण बसविणार असा प्रश्न आहे. कारण खाल पासून वर पर्यंत व्यवस्था भ्रष्ट झाली आहे. यावर वेळीच उपायोजना करण्याची गरज आहे.

# मानसिक आजारावर 'टेली मानस' व्दारे लक्षावधी जणांना समुपदेशन

### टोल फ्री क्रमांक १४४१६ वर ७० टक्के पुरूषांनी तर ३० टक्के महिलांनी घेतले समुपदेशन, निद्रानाश, ताण-तणाव व नैराश्यामुळे मानसिक आजार

देशभरात कोरोना नंतर मानसिक आजारांचे रूग्ण वाढत आहेत. त्यामुळे केंद्रीय आरोग्य विभागाने' टेली मानस ' हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत टोल फ्री क्रमांकावर फोन केल्यास त्यांना समुपदेशकाकडून समुपदेशन मिळते.

राज्यातील येरवडा, ठाणे, नागपूर अशा तीन प्रादेशिक मनोरुग्णालयात तर बीड येथे 'टेली मानस' कॅाल सेंटर सुरू केले आहे. आता पर्यंत लक्षावधी जणांनी समुपदेशन केले आहे. यामध्ये ७० टक्के पुरूषांना तर ३० टक्के महिलांनी १४४१६ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क केले. त्यांना मानसिक आजाराविषयी समुपदेशन केल्याची माहिती येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयाचे प्रभारी अधिक्षक श्रीनिवास कोलाड यांनी दिली.

कोलाड म्हणाले " लॉकडाऊनच्या काळात अनेकांना चिंता, नैराश्या व बेरोजगारीमुळे ताणतणाव निर्माण झाल्यामुळे मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे केंद्रिय आरोग्य विभागाने देशात 'टेली मानस' हा उपक्रम सुरु केला आहे. राज्यात चार ठिकाणी हा उपक्रम सुरु असून येरवड्यातील प्रादेशिक मनोरुग्णालयात टेली मानसचे कॉल सेंटर सुरु केले आहे. यामध्ये वीस समुपदेशक चोवीस तास आणि सातही दिवस सेवा देत आहेत. यामध्ये सुरवातीला कॉलमध्ये रुग्ण किती गंभीर आजारी आहे, याची माहिती मिळते. त्यामध्ये स्तर १ व स्तर २ अशी विभागणी केली आहे. स्तर एक मध्ये रुग्णाचा आजार सौम्य स्वरुपात असतो. तर स्तर दोन मध्ये रूग्णाला गंभीर स्वरुपात आजाराने ग्रासलेले असते. त्यामुळे अशा रुग्णांना तातडीने रुग्णालयात दाखल करुन उपचार घेणे क्रमप्राप्त असते.''

**दहा प्रकारचे मानसिक आजार**

दहा प्रकारचे मानसिक आजार व्दिध्रुवीय मनोविकार (स्वभावातील चढ- उतार ), ऑरगॅनिक मानसिक आजार, छिन्नमनस्कता ( स्किझोफ्रेनिया), उदासिनता, मानसिक दुर्बलता, फीट येणे किंवा अपस्मार, व्यसनाधिनता, स्मृतिभ्रंश आणि वर्तणूक, लैंगिकता आणि भटकंती यामुळे आले- ले मानसिक आजार, असे दहा प्रकारचे गंभीर मानसिक आजार असून या आजारांच्या उपचारासाठी मोठ्या प्रमाणात रुग्ण दाखल होऊन उपचार घेत असल्याचे डॉ. सुनिल पाटील यांनी सांगितले.

"मानसिक रुग्णांनी सकारात्मक विचार करून स्वत: व डॉक्टरांवर विश्वास ठेऊन औषधोपचार घेतले पाहिजे. नातेवाईकांबरोबर मनमोकळेपणे संवाद साधला पाहिजे. पुरेशी झोप व योगा व ध्यानधारणेमुळे मानसिक आजारावर प्रतिबंध करता येऊ शकते.''

– डॉ. श्रीनिवास कोलाड, प्रभारी अधिक्षक, येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालय

**चौकट हेडिंग.....**

राज्यातील विशेषत: पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली व पुणे जिल्ह्यातील प्रत्येकी दोन हजार तर मुंबई व छत्रपती संभाजीनगर मधील प्रत्येकी एक हजार जणांनी मानसिक आजारावर समुपदेश घेतले. तर सर्वाधिक समस्या निद्रानाश, ताण-तणाव, नैराश्य आदींच्या असल्याची माहिती टेली मानसचे वरिष्ठ समुपदेशकांनी माहिती दिली.

चार मनोरुग्णालयांची पाच हजार ७०० रुग्ण क्षमता आहे. त्यापैकी तीन हजार रुग्ण उपचार घेत आहेत. गेल्या सहा वर्षांत चारही रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागातून साधारत: बारा लाख रुग्णांनी औषधोपचार व समुपदेशन घेतले आहे. तर 'जिल्हा मानसिक आरोग्य अभियान' अंतर्गत ३४

पान ३ वर

# आत्महत्या एक वाढती समस्या






हा लेख अशा व्यक्तींसाठी आहे ज्यांना समाजात मानसिक, सामाजिक, आर्थिक, व्यावहारिक इत्यादी समस्येमुळे हताश वाटते आणि आत्महत्येचे विचार मनात येतात. अशा व्यक्तींना आपल्या कृतीतून व विचारांतून सकारात्मकतेकडे वळवणे आणि त्यांना आत्महत्येच्या विचारांपासून परावृत्त करणे हे अत्यंत गरजेचे आहे.

सर्वजण जाणताच आहात की आज जगभरातील कोविड-१९ या आजारासारख्या महामारीशी आपण अजूनही सामना करत आहोत. या महामारीमुळे सामान्य लोकांबरोबरच चाकरमान्यांचेही जीवन कोलमडून पडले आहे. बेरोजगारी, व्यसनाधीनता, ताण-तणाव, नैराश्य, घटस्फोट, नातेसंबंधातील दुरावा अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्याचबरोबर आर्थिक नुकसान, व्यापारावरील निर्बंध या अडचणीही आहेत. रोजच्या आयुष्यात नवनवीन प्रश्न निर्माण होत आहेत आणि या विविध समस्यांमुळे व्यक्ती हताश होऊन आत्महत्येचा मार्ग स्वीकारतो. आत्महत्येमागे काही घटक कारणीभूत ठरतात. त्याचाही प्रामुख्याने विचार करणे आवश्यक आहे.

सामाजिक घटकांमध्ये अन्न, वस्त्र, निवारा आणि त्यासोबत प्रतिष्ठेला अधिक महत्त्व दिले जात आहे. दैनंदिन गरजा पूर्ण करताना आपण प्रतिष्ठा मिळवण्यासाठी स्पर्धेत उतरतो. यश मिळवताना आपण त्याकडे सकारात्मकतेने पाहण्याऐवजी प्रतिष्ठेच्या उद्देशाने पाहतो. त्यातूनच यश-अपयशाचा प्रवास सुरु होतो आणि ताण-तणाव, स्पर्धा, नैराश्य व चिंतेमुळे व्यक्ती आत्महत्येकडे प्रवृत्त होतो.

मानसशास्त्रीय घटकांमध्ये मूड डिसऑर्डर सारख्या मानसिक आजाराशी निगडित असलेली व्यक्ती सतत आत्महत्येचा विचार

पान ३ वर




शोलेच्या पन्नाशीतही सिनेरसिक या चित्रपटातील खलनायक असलेल्या गब्बर सिंगला विसरू शकले नाहीत! एक अद्भुत भूमिका अमजद खान यांच्या नशिबाने या चित्रपटात मिळाली. खरंतर ही भूमिका त्यांच्या हातून निसटण्याच्या बेतात होती. मात्र कर्मधर्म संयोगाने ती त्यांना पुन्हा मिळाली, आणि मग त्यांनी ती जीव ओतून अजरामर केली. असा सिनेमा, अशी भूमिका पुन्हा पुन्हा होत नसते!

मुळात सिनेमा हे एक टिम वर्क असते. त्यामुळे एखादी भूमिका गाजते, सिनेमा गाजतो, हिरो गाजतो, तर त्याला केवळ तो वा ती एकच व्यक्ती कौतुकास पात्र नसते, तर ती भूमिका लिहिणारे लेखक, संवाद लेखक, कथाकार, पटकथा लेखक, दिग्दर्शक, छायालेखक, सिनेमॅटोग्राफर, संगीतकार, कलादिग्दर्शका पासून ते अगदी मेकअप मन, लाईटमन, स्पॉट बॉय पर्यंत सगळ्यांचा त्या यशात हातभार असतो!

शोलेच्या यशात जितका वाटा सलिम जावेद यांचा आहे, तितकाच महत्त्वाचा वाटा, या सिनेमाचं लोकेशन शोधून काढणाऱ्या कलादिग्दर्शकांचा आहे, आणि छायांकन आणि सिनेमॅटोग्राफी करणाऱ्या कॅमेरामनचाही आहे.

या सर्व कलाकारांमुळे यातील प्रत्येक कलाकाराला यश मिळाले, नाव मिळाले असंच म्हणावं लागेल. सर्वांनी शंभर टक्के योगदान दिल्यानेच शोले ही एक अद्भुत कलाकृती निर्माण झाली.

यातील अमजद खान म्हणजे ज्याच्या हातून गब्बरची भूमिका निसटता निसटता पुन्हा नशिबाने हाती आली! ती भूमिका तो जगला, आणि आगळ्यावेगळ्या संवादांमुळे आणि संवाद फेकी मुळे ही खलनायकी भूमिका अजरामर झाली. इतकी की त्या नंतर अनेक निर्मात्यांना, दिग्दर्शकांना गब्बर रात्री स्वप्नात येऊन सतावत राहतो, कि असा खलनायक आपल्याला निर्माण करता येईल का?

खरोखरच तेंव्हापासून आता पर्यंत अनेक निर्मात्यांनी दिग्दर्शकांनी प्रयत्न केले, पण पुन्हा गब्बर सिंग सारखा सत्तर एम एम खलनायक चित्रपट पडद्यावर अवतरू शकला नाही!

ज्या डॅनीच्या हातून ही भूमिका निसटली, त्याने अग्निपथ, घातक आदी



चित्रपटातून आगळावेगळा खलनायक साकारला! पण गब्बरची जादू त्यात नव्हती. अग्निपथ मध्ये दिग्दर्शक मुकुल आनंद यांनी डॅनीला कांचाचिना ही एक जबरदस्त खलनायक साकारण्याची संधी दिली, आणि नेहमी प्रमाणे डॅनी यांनीही ही भूमिका आपल्या जबरदस्त अभिनय क्षमतेने जिवंत केली, डॅनीला आणखी एक भूमिका दिग्दर्शक राजकुमार संतोषी यांनी घातक या सिनेमात दिली होती, कांत्याची, ती भूमिकाही अतिशय सुंदर लिहिल्या गेली होती. आणि डॅनीनेही आपल्या अभिनयाने ती भूमिका चांगलीच गाजवली! पण तरीही गब्बरची उंची नाही गाठता आली.

अमरिश पुरी यांनाही बोनी कपूर यांच्या मिस्टर इंडिया मध्ये मोगॅम्बो आणि राजकुमार संतोषी यांच्या घायल सिनेमात बलवंत राय हे दोन जबरदस्त

पान ३ वर

# कवितेत रमणारे बाळकृष्ण गुरुजी

कवितेत रमणारे बाळकृष्ण म्हणजेच राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त सेवानिवृत्त मुयाध्यापक बाळकृष्ण मुरलीधर बाचल गुरुजी. ७५० हून अधिक कविता, बालगीते, कथा, विविध लेख बाचल गुरुजींनी लिहिले आहेत.

'बालमेवा', 'बालरंग', 'शब्दस्पर्श', 'समर्पण', 'फुलांचे संमेलन'असे कविता व कथा संगह त्यांनी लिहिले आहेत. सतत बालमनाचा विचार करून गुरुजी लेखन करीत असतात. 'बालकोश' व 'बालकविता कोश' या मध्ये गुरुजींच्याचर कवितांचा समावेश आहे.

पुणे आकाशवाणीवर शैक्षणिक पाठ लेखन, भाषणे, काव्यवाचन, बालोद्यान कार्यकम, नभोनाट्य, मुलाखत, कविता व कथा सादरीकरण गुरुजींनी केले आहे व आजतागायत हे काम अखंड सुरू आहे.

बालचित्रवाणीमध्ये देखील गुरुजींनी आपल्या कवितेचे सादरीकरण केले



आहे. बालभारती च्या इयत्ता आठवीच्या' मराठी सुगम भारती ' या पुस्तकात गुरुजींची ' परोपकारी सोयरे 'ही कविता समाविष्ट आहे. त्या कवितेत ते लिहितात,

अशी ही झाडे ।  
परोपकारी सोयरे ।  
त्यांच्या वाचून जगणे ।  
व्यर्थ सारे वाटे ।

इयत्ता २ री च्या पुस्तकात गुरुजींच्या 'फुलांचे संमेलन ' मधील पाठ समाविष्ट केला आहे. तसेच इयत्ता आठवीच्या सेतू अभ्यासकमत गुरुजींची ' म्हणींची कविता' अभ्यासाला आहे.

बाळ बोले आजीला  
खेळ माझ्या संग ।  
बाळासवे खेळे  
आजी होऊनी या दंग ।

ही बाचल गुरुजींची अतिशय गाजलेली कविता. अनेक कार्यकमात गुरुजी ही कविता म्हणतात तेव्हा हमखास ' वन्स मोअर 'होतोच.

शिक्षक म्हणून काम करीत असताना त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. पुणे मनपाचा आदर्श शिक्षक पुरस्कार, राज्य शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच शैक्षणिक बाहुली नाट्य प्रशिक्षणात राष्ट्रपती शंकर दयाळ शर्मा यांचे हस्ते विशेष पुरस्कार मिळाला आहे.

गुरुजींचा सामाजिक कामातही मोठा वाटा आहे. सर निवृत्त होऊन बालकांचे मनोरंजन, प्रबोधन करण्यात मश्गुल आहेत. बालकांच्या विविध कार्यकमात ते आवर्जून जातात व कवितेच्या माध्यम ातून बालकांच्या चेहर्यावर हसू आणतात. बालांमध्येच रमणारे हे बाळकृष्ण बाचल साने गुरुजींप्रमाणेच निष्ठेने काम करीत असतात. त्यांच्या कवितेच्या प्रवासासाठी खूप शुभेच्छा!

– श्री. सुदाम कृष्णाजी विश्वे,  
(निवृत्त कलाशिक्षक) पुणे

'दैनिक महा मेट्रो', मालक, प्रकाशक, संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे, यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, शॉप नंबर १, बेसमेंट वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे- ४११०३० येथे छापून फ्लॅट नंबर ९, फ्रेंन्ड्स पॅराडाईज, शिरोळे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४ येथे प्रकाशित केले.
वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.
मालक, प्रकाशक आणि संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे – ९९२२९३०१९५, कार्यालय संपर्क क्रमांक : ९९७०६८८८६५ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.) Email : Mahametronews.pune1gmail.com

This 'Daily Maha Metro', Owner, Publisher by Dilip Kisan Kurhade printed at Shree Samarth Printers, Shop No. 1, Basement Vartak partment, 499, Shaniwar Peth, Pune 411030, Published from Flat No. 9, Friends Paradise Society, Shirole Road, Shivajinagar, Pune-411004.The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper. Legal matters will be resolved under Pune Courts. Owner, Publisher Editor Dilip Kisan Kurhade Contact No. - 9922930195, Office Contact No. - 9970688865 (Responsible for selection of news under PRB ct.) Email. - Mahametronews.pune@1gmail.com